*मुद्रा यशोगाथा*
*नाव :- सौ.आशा रावसाहेब गुरव*
*व्यवसाय :- घरगुती खानावळ*

**लाभार्थ्यांचे मनोगत :-** सौ. आशा रावसाहेब गुरव यांनी भारतमाता खानावळीच्या माध्यमातून खानावळ उद्योगाची सुरुवात २६/०१/२०१६ रोजी केली. प्रधानमंत्री मुद्रा योजनेतून त्यांना बँक ऑफ इंडिया वळीवडे शाखेनी मार्गदर्शन व मदत केली. तसेच त्यांना रु. १०००००/- इतके सीसी मंजूर केले. ह्या पैशातून त्यांनी मेस साठी लागणारी भांडी डबे पातेली व अन्य साहित्य विकत घेतले. खानावळीच्या माध्यमातून त्यांनी पांच स्त्रियांना रोजगार देऊ केला व त्यांना त्यांचा पायावर उभे राहण्याची संधि उपलब्ध करून दिली. सध्या त्यांच्याकडे दररोज ५० डब्यांची ऑर्डर असते. हे सर्व डबे त्या शासकीय कार्यालये, खासगी नोकरदार, विद्यार्थी व कामगार यांना पुरवतात. या सर्वाचे श्रेय त्या बँक ऑफ इंडिया शाखा गांधीनगर व प्रधानमंत्री मुद्रा योजनेला देतात.

